# प्रेमाविष्काराचा धूमधडाका!

**ज्या व्यक्तीच्या आयुष्यात प्रणयाचे चित्र फारसे रंगले नाही, आणि ज्यादिवशी- १४ फेब्रुवारी इ. स. २६९ रोजी त्या व्यक्तीला- म्हणजे व्हॅलेंटाईनला फाशी देण्यात आली, त्याचदिवशी आता सार्वजनिक आणि वैयक्तिक पातळीवर प्रेमाविष्काराचा धूमधडाका कसा काय सुरू झाला? कशी आणि कुठून झाली १४ फेब्रुवारी- प्रेमदिनाच्या उत्सवाची सुरवात ?**

अनेक देशात 'व्हॅलेंटाईन डे' म्हणून साजरा केला जाणारा १४ फेब्रुवारी- हा दिवस पूर्वी पोप गेलायसियसने 'सेंट व्हॅलेंटाईन डे' उत्सव स्वरूपात इ. स. ४९६मधे सुरू केला. पुढे इ.स. १४व्या शतकात काही साहित्यात, कवितांमध्ये या दिवसाचा उल्लेख आढळतो. शेक्सपियरने 'सेंट व्हॅलेंटाईन डे'चा उल्लेख "हॅमलेट" नाटकात केला आहे. त्यानंतर, साहित्यातील काही संदर्भ पकडून, व्हॅलेंटाईन = प्रणय ही नवीन विचारसरणी उदयास आली. पण त्यापूर्वी?

संत (सेंट) व्हॅलेंटीन हा तिसऱ्या शतकातील (जन्म इ. स. २२६) इटलीमधील सॅन व्हॅलेंटीनो नावाचा धर्मोपदेशक. त्याकाळी इटलीत क्रिश्चन धर्मास राजरोज मान्यता नव्हती. तो काळ होता पूर्व-यहुदी, पूर्व-क्रिश्चन, आणि पूर्व-इस्लामिक धर्मांचा. युरोप, उत्तर आफ्रिका आणि जवळच्या काही देशात मूर्तीपूजा, आत्म-जागृतीने प्रेरित धार्मिक, आध्यात्मिक आणि चमत्कारपूर्ण धार्मिक कल्पना होत्या. क्रिश्चन धर्म त्यांना मान्य नव्हता. रोमन साम्राज्यात जेव्हा क्रिश्चनांचा हिंसक छळ सुरू झाला तेव्हा व्हॅलेंटाईनने प्रस्थापित धार्मिक विचारांच्या बाहेर असणाऱ्यांनाही मदत केली. म्हणून त्याला तुरुंगातही डांबले; परंतु मग त्याची बाकी वागणूक, सर्वांना मदत करण्याची वृत्ती पाहून हळूहळू त्याची कीर्ती पसरू लागली. तत्कालिन क्लॉडियस गोथिकस(२) सम्राटाला व्हॅलेंटाईनचा सामाजिक चांगुलपणा आवडल्याने त्याने त्याला आपल्या दरबारात आमंत्रित केले. त्याचबरोबर व्हॅलेंटाईनने क्रिश्चन धर्मियांना पाठिंबा देऊ नये असाही आग्रह केला. व्हॅलेंटाईनने त्यास नकार दिल्याने चिडलेल्या सम्राटाने त्याला फाशीची शिक्षा ठोठावली. असं म्हणतात, की व्हॅलेंटाईनने त्याच्या मृत्यूच्या काही काळापूर्वी पूर्वीच्या ओळखीतील न्यायाधीश ॲस्टेरियसच्या मुलीला "आपल्या व्हॅलेंटाईनकडून" अशी सही करून प्रेमपत्र पाठवले होते. पण याबद्दलही ठोस पुरावा नाही

१४ फ़ेब्रुवारी इ. स. २६९ रोजी व्हॅलेंटाईनला फाशी देण्यात आली. फाशीचे कारण त्याचे प्रेमप्रकरण नव्हते तर त्याने क्रिश्चन धर्मास पाठिंबा दिला म्हणून त्याची हत्या केली गेली. एकंदरित १४ फेब्रुवारी हा सेंट व्हॅलेंटाईनच्या स्मृतिदिन. तेव्हा ज्या व्यक्तीला यादिवशी फाशी झाली त्या दिवशी- त्याच्या नावाने सध्याचे 'व्हॅलेंटाईन डे'चे म्हणजे चॉकोलेट्स, गुलाबाची फुले, भेटकार्डे, भेटवस्तू... इत्यादींच्या माध्यमातून प्रणयाचे आणि प्रेमाविष्काराचे चित्र तेव्हा आणि काही काळ कुठेच नव्हते.

आता व्हॅलेंटाईन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रेमदिनासाठी हंगामी प्रेमपत्रे पाठवण्याची प्रथा १८००च्या मध्यापासून अमेरिकेत सुरू झाली. अलिकडच्याच एका पाहणीनुसार व्हॅलेंटाईन डेच्या दिवशी 'यू. एस. ए. टूडे' च्या एका अहवालानानुसार, यंदा अमेरिकेत सुमारे २०० मिलियन्स (२० कोटी) कार्डांची देवाणघेवाण, ५०-६० मिलियन (५-६ कोटी) पौंड चॉकोलेट्सची विक्री, ११ मिलियन (१.१ कोटी) गुलाबांची खरेदी आणि किंमती भेटवस्तू यावर सुमारे २८ बिलियन्स (अब्ज) डॉलर्सची उलाढाल झाली. असो! उत्सवामुळे कुणाचे नातेसंबंध दृढ होत असतील, आणि सामाजिक हानी होत नसेल तर चांगलेच आहे.

बाकी, समाजप्रवाहाविरुध्द जाणाऱ्यांचा छळ, हत्या केल्याची आणि काही काळानंतर त्यांना महत्व, देवत्व बहाल केल्याची अनेक उदाहरणे जगात आहेत. सेंट 'वॅलेंटाईन त्यापैकीच एक नाव!

**- विनता कुलकर्णी**

फेब्रुवारी १४, २०२०

***


Copy Rights: Vinata Kulkarni